दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता

vadalvartanews@gmail.com ●संपादक : अजय भांगे ●उपसंपादक : गणेश गाडेकर https://epaper.vadalvarta.com

● बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● गुरुवार दि.१८ सप्टेंबर २०२५ 9422660077 ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष ३ रे ● अंक ३३ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

● Beed (Mahmar) Daily Marathi ● Thrusday 18 Sep 2025 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 3rd ● Issue 33 ● Pages 4 ● Rate 4 Rs

**प्रतिनिधी नेमणे आहे**

लोकप्रिय विभागीय दैनिक वादळ वार्ता साठी महाराष्ट्रात सर्वत्र जिल्हा, तालुका, सर्कल व गावस्तरावर प्रतिनिधी नेमणे आहे. तरी इच्छुकानी मो.न.9422660077, 9766440025 संपर्क साधावा.

# बीडच्या जनतेच्या स्वप्नपूर्तीचा ऐतिहासिक दिवस-देवेंद्र फडणवीस

## अमळनेर (भां) ते बीड नवीन रेल्वे मार्गाचे उद्घाटन आणि बीड ते अहिल्यानगर रेल्वेचा शुभारंभ



बीड (प्रतिनिधी)-अनेक दशकांपासून बीडच्या जनतेने प्रतीक्षा केलेली रेल्वे आज बीड येथून सुरू झाली असून, बीडकरांना ऐतिहासिक भेट देत रेल्वेचे स्वप्न पूर्ण झाल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. हे स्वप्न पूर्ण करण्यासाठी दिवंगत गोपीनाथराव मुंडे, केशरकाकू क्षीरसागर यांचा मोठा वाटा असल्याचेही त्यांनी सांगितले.अमळनेर (भां) ते बीड नवीन रेल्वे मार्गाचे उद्घाटन आणि बीड ते अहिल्यानगर रेल्वेचा शुभारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रेल्वेला हिरवा झेंडा दाखवून केला. यानिमित्ताने आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार, पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री श्रीमती पंकजा मुंडे, खासदार रजनी पाटील, खासदार बजरंग सोनवणे, आमदार सर्वश्री विक्रम काळे, धनंजय मुंडे, विजयसिंह पंडित, आमदार श्रीमती नमिता मुंदडा, विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिपचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान, पोलीस अधिक्षक नवनीत काँवत, मध्य रेल्वे महाप्रबंधक धर्मवीर मीणा, विभागीय रेल्वे प्रबंधक राजेशकुमार वर्मा आदी उपस्थित होते.

### आजचा दिवस श्रेयवादाचा नसून आनंदाचा

रेल्वे संघर्ष समितीच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे आज हा दिवस शक्य झाल्याचे सांगुन मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, हा दिवस श्रेयवादाचा नसून आनंदाचा आहे. बीडमध्ये रेल्वे सुरू होणे म्हणजे फक्त गाडी पोहोचणे नव्हे तर विकासाची वाहिनी पोहोचणे आहे. सन २०१४ नंतर आमच्या सरकारने या प्रकल्पाला गती दिली. केंद्र व राज्याने ५० टक्के हिस्सा देत प्रकल्प पूर्णत्वाकडे नेला. रेल्वेचे विद्युतीकरणही लवकरच पूर्ण होईल आणि यामुळे प्रवास अधिक सोयीस्कर आणि वेगाने होईल. असे ते म्हणाले.

### मराठवाड्यातील दुष्काळ संपवण्यासाठी वचनबद्ध

मराठवाडा मुक्ती दिन आणि रेल्वे प्रकल्पाचा आनंद दुहेरी असल्याचे सांगताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, गेल्या दहा वर्षांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मराठवाड्यासाठी रेल्वे प्रकल्पांना तब्बल २१ हजार कोटी रुपये दिले. ज्यामुळे विकासाच्या दिशा खुल्या झाल्या. सरकार मराठवाड्यातील दुष्काळ संपवण्या साठी वचनबद्ध असून, पाण्याचे जाळे निर्माण करण्यासाठी कृष्णा व उल्हास खोऱ्यातील पाणी आणण्याचे मोठे प्रकल्प राबवले जातील.


उपमुख्यमंत्री श्री. पवार यावेळी म्हणाले की, आता जनतेचे प्रश्न सोडवायाचे आहेत. ३० ते ३५ वर्षानी रेल्वेचे हे काम झाले आहे. या कामासाठी विलंब झाला आहे. यासाठी आत्मचिंतन करण्याची गरज आहे. पुर्वीचा काळ व आजचा काळ यामध्ये मोठा फरक आहे. आज कृत्रिम बुध्दीमत्तेचा वापर होत आहे. ही रेल्वे पुणे आणि पुढे मुंबई पर्यंत घेवून जाण्यासाठी आपण प्रयत्नशिल आहोत. जिल्ह्यातील सहाही विधानसभा मतदारसंघातील कोणतीही विकास कामे अडणार नाही याकडे लक्ष देण्यात येईल. रेल्वेचे स्वप्न पूर्ण झाले असून आता विमानतळाकडे आपले लक्ष आहे. जिल्ह्यात उद्योगपती आल्यास उद्योग स्थापन करुन रोजगार उपलब्ध होतील. बीडमधील गोरगरिबांना उपचारासाठी मुंबई-पुण्याला जाण्याची आवश्यकता पडणार नाही. यासाठी येथेच आरोग्याच्या चांगल्या सुविधा निर्माण करणार असल्याचे त्यांनी सांगितले. विकास करत असतांना त्यातुन मार्ग काढावा लागतो, असे सांगुन श्री. पवार म्हणाले, बीड जिल्ह्याच्या विकास कामासाठी निधी कमी पडू देणार नाही. मोठ्या शहरातील रस्ते, मेट्रो, विमानतळ यासारख्या प्रकल्पाकडे लक्ष देत असतांना आमच्या ग्रामीण भागाचासुध्दा विकास झाला पाहिजे या दृष्टीने ग्रामीण भागातही रस्ते, दळणवळणासारख्या पायाभुत सुविधांच्या विकासासाठी विशेष प्रयत्न करण्यात येत आहेत. या रेल्वेच्या माध्यमातून मराठवाड्याच्या विकासाचा, समृध्दीचा नवा अध्याय लिहिला जाईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. आजचा दिवस मराठवाड्याच्या रेल्वेच्या इतिहासातील स्वर्णीम दिवस आहे. बीड जिल्ह्याचा सर्वांगीण विकास हेच आपले ध्येय असल्याचे त्यांनी सांगितले. खासदार रजनी पाटील, खासदार बजरंग सोनवणे यांनीही यावेळी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मध्य रेल्वेचे महाप्रबंधक धर्मवीर मिणा यांनी केले. डॅशबोर्डचे उद्घाटन आणि बीड शहर पोलीस स्टेशनचे व २४१ पोलीस निवासस्थानाचे उद्घाटन प्रारंभी मंचावर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या डॅशबोर्डचे उद्घाटन आणि बीड शहर पोलीस स्टेशनचे व २४१ पोलीस निवासस्थानाचे उद्घाटन ऑनलाईन पध्दतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. कार्यक्रमाला लोकप्रतिनीधी, विविध विभागाचे अधिकारी तसेच नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### राष्ट्रीय महामार्गासाठी सुमारे १० हजार कोटी रुपये निधी

मंत्री श्रीमती पंकजा मुंडे म्हणाल्या की, बीड येथे रेल्वेसाठी सर्व लोकप्रतिनीधीनी पुढाकार घेतला. रेल्वे ही नागरिकांच्या उन्नतीसाठी असणे आवश्यक आहे. विलासराव देशमुख आणि गोपीनाथराव मुंडे यांनी मराठवाड्यात रेल्वे आली पाहिजे यासाठी पुढाकार घेतला. बीड जिल्हा कष्टकऱ्यांचा आणि स्वाभिमानी लोकांचा आहे. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी जिल्ह्यातुन जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गासाठी सुमारे १० हजार कोटी रुपये निधी दिला. बीडला रेल्वे यावी यासाठी अनेकांनी आपले योगदान दिले. जिल्ह्याच्या विकासासाठी आपलेही योगदान देण्याची तयारी आहे. जिल्ह्यावर मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांनी कृपादृष्टी ठेवावी अशी अपेक्षा त्यांनी यावेळी व्यक्त केली.

## ग्रामीण रुग्णालयात नायगाव येथे रक्तदान व आरोग्य शिबीराचे आयोजन

**नायगाव । हनुमंत चंदनकर**



येथील ग्रामीण रुग्णालयात नायगाव येथे गुरुवार, दि. १८ सप्टेंबर रोजी स्वस्थ नारी सशक्त परिवार - अभियान राबविण्यात येणार आहे. सदर अभियानांतर्गत सकाळी नऊ ते सायंकाळी पाचपर्यंत जिल्ह्याचे मा.खा. रविंद्र वसंत पा.चव्हाण, मा.आमदार राजेश पवार मा. पूनमताई राजेश पवार मा.क्रांती डोंबे मॅडम (उप जिल्हा अधिकारी)मा.तहसीलदार धम्मप्रिया गायकवाड मॅडम मा.श्याम पानेगावकर उपविभागीय पोलीस अधिकारी मा.गंधाली पवार मुख्य अधिकारी नगर पंचायत नायगाव मा.अर्चना संजय चव्हाण नगर अध्यक्षा नायगाव विजय पाटील चव्हाण उपनगर अध्यक्ष नगर पंचायत नायगाव व इतर मान्यवराच्या उपस्थितीत रक्तदान व आरोग्य शिबीर आयोजित केले आहे. नारी सशक्तिकरण कार्यक्रमां तर्गत स्त्रीरोग तपासणी, लहान बालकांची तपासणी, आहार विषयक तज्ज्ञांचा सल्ला, आभा, आयुष्यमान व वयोवंदना कार्डनोंदणी व वितरण याच शिबिरात करण्यात येणार आहे. सदरील शिबिरात तज्ज्ञ डॉक्टर उपस्थित राहून मार्गदर्शन व सेवा देणार आहेत. तरी शहर व जिल्ह्यातील सर्व गरजू स्त्री रुग्णांनी व बालकानी या शिबिराचा जास्तीत जास्त संख्येने लाभ घ्यावा असे आवाहान जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. एस. एम. पेरके आणि ग्रामीण रुग्णाच्या वैद्यकीय अधीक्षका डॉ. अपर्णा पुपलवाड मॅडम यांनी केले आहे.

## बीड रेल्वे स्थानकाला डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावासाठी जलसमाधी आंदोलन

### प्रशासनाच्या आश्वासनानंतर आंदोलन तुर्तास स्थगित-बाळासाहेब मोरे पाटील

**बीड । प्रतिनिधी**




बीड रेल्वे स्थानकाला भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्यात यावे, या प्रमुख मागणीसाठी शिवशक्ती भीमशक्ती विचार मंचच्या वतीने पाली येथील बिंदुसरा धरणात जलसमाधी आंदोलन करण्यात आले. या आंदोलनाचे नेतृत्व मंचाचे प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब मोरे पाटील यांनी केले. प्रशासनाकडून ठोस लेखी आश्वासन मिळाल्यानंतर आंदोलन काही काळाने स्थगित करण्यात आले.आज दि.१७ सप्टेंबर मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या पार्श्वभूमीवर बीड ते अहिल्यानगर रेल्वेगाडीला मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत हिरवा झेंडा दाखवून शुभारंभ करण्यात येणार आहे. मात्र, बीड रेल्वे स्थानकाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्याची मागणी दीर्घकाळापासून प्रलंबित आहे. ही मागणी लवकरात लवकर मान्य व्हावी, यासाठी पाली येथील बिंदुसरा धरणात जलसमाधी आंदोलन छेडण्यात आले. रेल्वे स्थानकाला लोकनेत्यांचे नाव दिल्यास सामाजिक ध्रुवीकरण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. लोक नेत्यांच्या नावाविषयी मतभेद आहेत परंतु महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाला अद्याप कोणीही विरोध केल्याचे दिसून येत नाही त्यामुळे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाला जिल्हा वासियांची पसंती असल्याचे सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी सांगितले.१७ सप्टेंबर रोजी झालेल्या या आंदोलनावेळी पाली गावचे तलाठी अनिल गायकवाड, मंडळ अधिकारी शीतल चाटे, पोलीस उपनिरीक्षक नितीन काकरवाल, पो. कॉ. दुबाले, बाबर, जायभाय, तसेच आम आदमी पार्टी बीड जिल्हाध्यक्ष अशोक येडे, बीड शहराध्यक्ष सय्यद सादेक, रासप बीड तालुकाध्यक्ष बाबासाहेब सापणकर, रामहरी चाळक अंजनवतीकर आणि सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे यांची उपस्थिती होती.प्रशासनाने या मागणीसंदर्भात सकारात्मक भूमिका घेतल्याचे आश्वासन दिल्यानंतर आंदोलन काही वेळाने स्थगित करण्यात आले. मात्र, जर मागणी पूर्ण न झाल्यास पुन्हा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा आंदोलनकर्त्यांनी दिला आहे.

## केज येथे मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनानिमित्त वृक्षारोपण कार्यक्रम

**केज । प्रतिनिधी**

दिनांक १७ सप्टेंबर रोजी मराठवाडा मुक्ती संग्राम दिना निमित्ताने केज येथे वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडला.हा उपक्रम होमगार्ड जिल्हा समादेशक श्री.सचिन पानकर साहेब व केंद्र नायक श्री.सुरेश झवेरी सर यांच्या आदेशानुसार राबविण्यात आला.या उपक्रमाचे आयोजन केज तालुका समादेशक राऊत दिनकर व सुनील कुलकर्णी,चाटे राजाभाऊ पलटण नायक,गणेश वाघमारे पालटण नायक व केज होमगार्ड पथक यांच्या वतीने करण्यात आले.या वेळी तालुका समादेशक राऊत दिनकर यांनी सांगितले की,आज लावलेले झाड हे फक्त एक रोप नाही, तर उद्याच्यापिढ्यांसाठी आपले हिरवे वारस आहेत.मराठवाडामुक्ती संग्रामातील शूरवीरांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी त्याग केला,त्याच प्रेरणेने आपणही समाजासाठी,निसर्गा साठी योगदान देणे आवश्यक आहे.यापुढेही अशा उपक्रमांतून होमगार्ड दल समाजहितासाठी आणि पर्यावरण रक्षणासाठी सतत कार्यरत राहील.

या कार्यक्रमात होमगार्ड पथकातील जवानांनी उत्साहाने सहभाग घेतला.



## तुलसी महाविद्यालयात मराठवाडा मुक्तिसंग्राम दिन उत्साहात साजरा

**बीड । प्रतिनिधी**


देवगिरी प्रतिष्ठान संचलित तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालय, बीड येथे बुधवार (दि.१७) रोजी मराठवाडा मुक्तिसंग्राम दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.



कार्यक्रमाची सुरूवात महापुरुषांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. त्यानंतर, विशेष पाहुणे डॉ. सुनील जोंधळे यांच्या हस्ते सकाळी ७.४५ वाजता महाविद्यालयाच्या प्रांगणात ध्वजारोहण संपन्न झाले.ध्वजवंदनानंतर उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना देशप्रेम, सामाजिक जबाबदारी आणि मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाचे महत्त्व अधोरेखित केले. तसेच स्वातंत्र्यसेनानींच्या त्यागाचे स्मरण ठेवून राष्ट्रसेवेची प्रेरणा घेण्याचे आवाहनही त्यांनी केले.यावेळी प्रा.डी.जी.निकाळजे (प्राचार्य, तुलसी महाविद्यालय), डॉ. विजयकुमार बांदल (प्राचार्य, गुरुकुल महाविद्यालय), डॉ.अश्विनी बेद्रे (प्राचार्य, फॅशन कॉलेज), प्रा.डी.डी. राऊत (प्राचार्य, नर्सिंग कॉलेज) आणि प्रा.प्रकाश ढोकणे (प्राचार्य, कनिष्ठ महाविद्यालय) यांच्या प्रमुख उपस्थितीत प्राध्यापकवर्ग, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संपादकीय

# मराठी साहित्याचा विश्वास




९९ व्या मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ साहित्यिक आणि पानिपतकार विश्वास पाटील यांची निवड यंदा बहुमताने करण्यात आली. साहित्यिकांच्या सरकारी पैशाने मिरवण्याचा उत्सव असे जे स्वरूप या उत्सवाला आले होते त्याला यंदा विश्वास पाटील यांच्यासारख्या समर्थ साहित्यिक आणि कादंबरीकाराच्या निवडीमुळे छेद दिला गेला, असे म्हणावे लागेल. विश्वास पाटील हे नाव साहित्य जगतात आदराने घेतले जाते. ते सनदी अधिकारी तर होतेच पण 'पानिपत', 'महानायक' आणि 'झाडाझडती' सारख्या काही प्रचंड गाजलेल्या कादंबऱ्यांचे लेखकही आहेत. त्यामुळे साहित्यिक म्हणून त्यांचा दरारा कायम आहे. यापूर्वी काही अध्यक्ष होऊन गेले. मध्यंतरी साहित्य संमेलने नकोतच असे म्हणणारा गट निर्माण झाला होता. पण संमेलनं चालू आहेत. विश्वास पाटील यांच्याबाबतीत त्यांचे प्रत्येक लेखन हे आदरास पात्र असते. भले ते कुणाला आवडो अथवा न आवडो पण साहित्यिक म्हणून त्यांचे मूल्यमापन करता येईल. त्यादृष्टीने विश्वास पाटील यांची निवड ही अत्यंत योग्य आहे. साताऱ्यासारख्या शहरात होणाऱ्या संमेलनात ती यथार्थ आहे. साहित्य संमेलन आणि वाद काही नवे नाही. अगदी पहिल्या संमेलनात म्हणजे १८७८ साली झालेल्या साहित्य संमेलनात वाद गाजला होता, तो म्हणजे तेव्हाचे वंचितांचे पुढारी महात्मा जोतिबा फुले यांना आमंत्रण देऊनही ते स्वीकारण्यास त्यांनी नकार दिला होता आणि त्यामुळे हा वाद गाजला होता. १९७५ च्या साहित्य संमेलनात तर दुर्गा भागवत यांनी मंत्री यशवतराव चव्हाण यांना व्यासपीठावर बसण्यास मनाई केली होती. त्यामुळे यशवंतराव तेव्हा सभागृहात बसले होते. साहित्य समेलनांना वादाची पार्श्वभूमी आहे. यापूर्वी झालेल्या साहित्य संमेलनात सरकारी हस्तक्षेपामुळे संमेलनच नको म्हणून ते गाजले होते. याला अपवाद गेल्या वर्षी दिल्ली येथे झालेल्या साहित्य संमेलनाचाही करता येणार नाही. कारण त्या संमेलनात सरकारी हस्तक्षेप सरळ सरळ दिसत होता. सरकारी हस्तक्षेपास कुणाचाच विरोध नाही, पण त्यालाही एक मर्यादा हवी. पण साहित्यिकच आपल्या माना जर राजकारण्याच्या हातात देणार असतील तर मग त्यांना दोष देता येणार नाही. आजवर असेच होत आले आहे. दुर्गा भागवतांसारखे अपवाद सोडले तर बरेचसे साहित्यिक सरकारपुढे नांग्या टाकणारे ठरले आहेत. विश्वास पाटील यांच्याबाबतीत तसे म्हणता येणार नाही. सरकारपुढे नांग्या टाकू नका. याचा अर्थ नेहमीच त्यांच्याविरोधात तलवारी उपसून बसा असेही नाही. पण योग्य वेळी आपला स्वाभिमान दाखवला पाहिजे.

विश्वास पाटील यांनी सरकारी नोकरी करताना वेळोवेळी तसा स्वाभिमान दाखवला आहे; परंतु विश्वास पाटील यांच्याबाबतीत असे वाद होण्याची शक्यता दिसत नाही, कारण त्यांचे साहित्यिक स्थान आज प्रचंड उंच आहे आणि त्यामुळे त्यांच्यावर कुणी प्रश्नचिन्ह उपस्थित करणार नाही. शिवाय विश्वास पाटील यांची निवड एकमताने झाली आहे. मुख्य प्रश्न हा आहे, की मराठी साहित्य वाचणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस कमी होत चालली आहे आणि मराठी वाचन तर हल्ली दुर्मीळच झाले आहे. त्याबाबतीत विश्वास पाटील हे काही तरी करू शकतील. त्यांनीच सांगितले आहे, की नुसते एक गाव वाचनालयाचे म्हणून चालणार नाही तर गावोगावी वाचनालय चळवळ सुरू करावी लागेल. याबाबतीत विश्वास पाटील यांनी वर्षभराच्या मुदतीत काही तरी ठोस करावे हीच अपेक्षा त्यांच्याकडून आहे. आज मराठी साहित्यापुढे अनेक प्रश्न आहेत. मराठी शाळा बंद पडत आहेत आणि मराठी लोक महाराष्ट्रापासून दूर जात आहेत. परभाषिकांनी आक्रमण केले आहे आणि प्रत्येक क्षेत्रात मराठी लोक मागे हटत आहेत किंवा हटवले जात आहेत. याबाबतीत विश्वास पाटील यांनी चळवळ उभारावी हे अपेक्षित आहे. कारण त्यांनी वाचनालय चळवळ उभारण्याचे संकेत दिले आहेत तसेच ते मराठी शाळा वाचवण्यासाठी काही तरी करतील. प्रत्येक मराठी साहित्य संमेलनाने या अगोदर शब्द दिला होता. पण पुढे काहीही झाले नाही. मराठी वाचकांची संख्या फारच कमी आहे आणि आपल्याकडे ना. सी. फडके, आचार्य अत्रे वगैरे वाचणाऱ्यांची पिढी एकेकाळी होती, ती आता अस्तंगत झाली आहे. नव्या पिढीला हॅरी पॉटर वाचण्याचे वेड आहे आणि तेही जाऊन आता मोबाइल आणि इतर गॅझेटचे वेड आहे. त्यापासून नव्या पिढीला वाचवायचे कसे असा यक्षप्रश्न आहे. तो विश्वास पाटील आणि त्यांच्यासारख्या साहित्यिकांवर ही फार मोठी जबाबदारी आहे. कारण त्यांच्यावरच हे शिवधनुष्य पेलण्याची ताकद आहे आणि त्यांच्याकडे तितकी प्रतिभाही आहे.विश्वास पाटील हे शेतकरी कुटुंबातून आलेले. त्यांचा जन्म सातारा जिल्ह्यातील नेर्ले येथे झाला. त्यांचे वडील चौथी पास होते, तर आईने शाळाही पाहिली नाही. त्यांचा विश्वास हा पुत्र आज सनदी अधिकारी म्हणून निवृत्त झाला. त्यांनी प्रचंड गाजलेल्या कादंबऱ्या लिहिल्यात. 'पानिपत' आणि 'महानायक' ही सुभाषचंद्र बोस यांच्या जीवनावरील कादंबरी प्रचंड गाजली. शेतकरी कुटुंबातून आलेल्या विश्वास यांना ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांची दुःखे आणि वेदना यांचा जवळून परिचय होता, पुढे ते शासकीय सेवेत रुजू झाले तेव्हा त्यांच्या ते कामी आले. शासकीय सेवेत असताना त्यांनी शासकीय योजनांचा लाभ लोकांना कसा देता येईल हे पाहिले. पण त्यांच्या साहित्यिक योगदानाविषयी बोलताना असे म्हणता येईल, की त्यांची साहित्यिक वीण ही त्यांना कादंबरी लेखनाकडे घेऊन गेली. 'महानायक' असो की 'झाडाझडती' या सर्व कादंबऱ्यांतून उपेक्षित वर्गाची तडफड दिसते. पानिपतचा अपवाद वगळता त्यांची ही उपेक्षितांची तडफड नेहमीच केंद्रस्थानी राहिली आहे. साहित्य संमेलन म्हणजे केवळ तीन दिवस मिरवण्याचा उत्सव ही प्रथा विश्वास पाटील बदलून टाकतील यात काही शंका नाही. साहित्य चळवळ खऱ्या अर्थाने जनसामान्यांची चळवळ कशी होईल हे पाटील पाहतील यात शंका नाही. विश्वास पाटील यांच्या निवडीने एक सर्वोत्कृष्ट कादंबरीकार आणि साहित्यिकाची निवड झाली आहे. त्यांच्याकडून मराठी रसिकांना अपेक्षाही तितक्याच आहेत.

# बीडला रेल्वेमार्ग आणण्याचे सर्व श्रेय स्व.विलासराव देशमुख साहेबांना

बीड जिल्ह्यात रेल्वेमार्ग यावा यासाठी अनेक वर्षांपासून मागणी होत होती .२००५ सालापासुन तीव्र आंदोलनांची सुरवात झाली..विद्यार्थी कृती समिती,स्वातंत्र्य सैनिकांची समिती जेष्ठ नागरिक कृति समिती यांच्याद्वारे वेगवेगळ्या पद्धतीने आंदोलने करण्यात येत होती.विद्यार्थी कृती समिती कडुन टॉवर वर चढणे,आकाशवाणी बंद पाडणे,पोस्ट ऑफीस बंद पाडणे यासारखी आंदोलने करण्यात आली. जिल्हाभरात बंद, रस्तारोको यातुन आंदोलनाची धग वाढत होती. अशातच ३१ डिसेंबर २००८ रोजी संभाजीनगर येथे सर्व आंदोलकांनी एकत्र येवुन जेष्ठ नेते केंद्रीय मंत्री मा.शरदचंद्र पवार साहेब यांची भेट घेऊन बीड जिल्ह्यातील रेल्वेमार्ग संदर्भात लक्ष घालण्याची विंनती करण्यात आली. तेंव्हा पवार साहेबांनी मी रेल्वेमार्ग मंत्री लालूप्रसाद यादव यांची भेट घेऊन त्यांचा वेळ तुम्हाला घेऊन देतो आसे प्रकारचे स्पष्ट आश्वासन आम्हाला दिले. व नंतरच्या काही दिवसाच्या कालावधीत पवार साहेबांनी तत्कालीन पालकमंत्री विमलताई मुंदडा यांच्या मार्फत निरोप देऊन आम्हास दिल्लीला बोलावून घेतले. या शिष्टमंडळात बीडवरून विद्यार्थी, स्वातंत्र्य सैनिक, व्यापारी,आजी माजी लोकप्रतिनिधींसह जवळपास शंभर लोक स्वखर्चाने दिल्लीत उपस्थित होते. रेल्वे भवनला लालूजी यादव, शरदचंद्र पवार साहेब यांच्या उपस्थितीत बैठक झाल्यावर बीड नगर रेल्वेमार्ग हा फिजिबल नाही अर्थिकदृष्ट्या फायदे शीर नाही नाही. तोट्यातले रेल्वेमार्ग आंम्ही बंद करत आहोत.हा रेल्वेमार्ग करावायचा असेल तर केंद्राबरोबर एकुन खर्चाच्या ५० टक्के रक्कम राज्याने द्यावी तरच हा.रेल्वेमार्ग पुर्ण करू आसे लालूजी यादव यांनी ठणकावून सांगितले.शिष्टमंडळ हात हलवत परत आले



अशोक हिंगे
रेल्वे आंदोलक



परत मुंबई च्या दृष्टीने प्रयत्न सुरू झाले. आंदोलक अमोल गलधर यांनी तात्कालिन पालकमंत्री विमलताई मुंदडा यांच्याकडेतर मी काँग्रेस नेत्या माजी खासदार रजनीताई पाटील यांच्याकडे,माजी आमदार राजेंद्रजी जगताप यांनी तात्कालिन मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्याकडे चर्चेसाठी प्रयत्न सुरू केले.त्याचाच भाग म्हणून विलासराव देशमुख साहेबांनी रेल्वे आंदोलक, स्वातंत्र्यसैनिक,तात्कालिन लोकप्रतिनिधी यांची एक बैठक मुंबई येथे बोलावली लालूप्रसाद यादव यांच्या सोबत झालेल्या बैठकीचा सर्व वृतांत त्यांना सांगुन बीड जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी जिल्ह्यात रेल्वेमार्ग आणणे किती आवश्यक आहे हे सर्वानीच.सांगितले. स्वता विलासराव देशमुख यांना बीड जिल्ह्याची परिस्थिती अवगत आसल्याने केंद्राच्या प्रस्तावास त्यांनी हिरवा कंदिल दाखवला..

आणी काही दिवसातच मा.मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांनी नगर बीड परळी रेल्वेमार्गाच्या खर्चाचा ५० टक्के खर्च महाराष्ट्र सरकार उचलणार असा ऐतिहासिक निर्णय घेऊन तसा ठराव केंद्राकडे पाठवला .आणी इथूनच या रेल्वेमार्गाच्या प्रत्यक्ष कामाची मुहूर्तमेढ रोवण्यात आली..! हा निर्णय विलासराव देशमुख साहेब घेत नव्हते तर हा मार्ग बासनात गुंडाळून गेला असता.त्यामुळेच हा रेल्वेमार्ग पूर्णत्वास येत आहे त्याचे श्रेय फक्त आणी फक्त तात्कालिन मुख्यमंत्री मा. विलासराव देशमुख यांनाच व या रेल्वेमार्गासाठी वेळोवेळी रस्त्यावर उतरून आंदोलन करणारे ,वेळ प्रसंगी जेल मधे जाणारे विद्यार्थी,युवक जेष्ठ नागरिक, स्वातंत्र्य सैनिक, आंदोलनात उतरणाऱ्या आजी माजी लोकप्रतिनिधींना,सामान्य नागरिक यांना जाते.

# बोरद ग्रा.प.मध्ये अभियानाचे उद्घाटन गावाच्या विकासाला मिळणार गती

**बोरद । मंगेश पाटील**

राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी ग्रामपंचायतींना अधिक सक्षम आणि स्वयंपूर्ण बनवण्याच्या उद्देशाने नंदुरबार जिल्ह्यात 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान' सुरू करण्यात आले आहे. 'सशक्त पंचायत महाराष्ट्र' हे ध्येय वाक्य घेऊन सुरू झालेल्या या अभियानामुळे ग्रामीण भागाच्या विकासाला नवी गती मिळणार असून गावांमध्ये सुशासन, आर्थिक स्वावलंबन आणि सामाजिक न्याय प्रस्थापित करण्याचे उद्दिष्ट आहे. हे अभियान १७ सप्टेंबर ते ३१ डिसेंबर २०२५ या कालावधीत राबवले जाणार आहे. याचाच एक भाग म्हणून, बोरद ग्रामपंचायतीमध्ये या अभियानाचे औपचारिक उद्घाटन करण्यात आले. पंचायत समितीचे शिक्षण विस्तार अधिकारी ज्ञानेश्वर भुजंग केदार यांच्या हस्ते सकाळी ९ वाजता ग्रामपंचायत कार्यालयात या कार्यक्रमाचे उद्घाटन झाले.

यावेळी बोरद गावच्या सरपंच अनिता भिलाव कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होत्या. सर्वप्रथम त्यांच्या हस्ते संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या कार्यक्रमाला उपसरपंच विठ्ठल धोदरे, ग्रामपंचायत सदस्य जुल्फिकार तेली, अजय मगरे, ज्योतीबा ई. साळवे, निळूबाई ठाकरे, लताबाई पवार, नीलिमा जाधव यांच्यासह माजी ग्रामपंचायत सदस्य मंगेश पाटील, शांतीलाल पवार, सामाजिक कार्यकर्ते रवींद्र भिलाऊ, दीपक जाधव आदी मान्यवर उपस्थित होते.

याव्यतिरिक्त, गावातील सर्व आरोग्य कर्मचारी, अंगणवाडी सेविका, मदतनीस, आशा वर्कर, महिला बचत गटांच्या सदस्य, जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक व शिक्षक तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन ग्रामविकास अधिकारी विजय पाटील यांनी केले. यावेळी बोलताना ते म्हणाले की, या अभियानामुळे बोरद गावाच्या विकासाला नक्कीच एक नवीन दिशा मिळेल, अशी आशा त्यांनी व्यक्त केली. हे अभियान ग्रामीण विकासाच्या दिशेने टाकलेले एक महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे.

# जिल्ह्यात सेवा हमी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी नंदुरबारचा राज्यात अव्वल जिल्ह्यांत समावेश

**नंदुरबार । दिपक गोसावी**

दिनांक १७ सप्टेंबर, २०२५ राज्यातील आदिवासी आणि दुर्गम जिल्हा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नंदुरबार जिल्ह्याने सेवा हमी कायद्याच्या अंमलबजावणीत नेत्रदीपक यश मिळवले आहे. राज्यात सर्वाधिक प्रभावी अंमलबजावणी करणाऱ्या जिल्ह्यांमध्ये नंदुरबार अग्रस्थानी असून, जिल्ह्याने तब्बल ९९% उद्दिष्ट साध्य केले आहे. उर्वरित १% साठी सर्व यंत्रणांनी अधिक प्रयत्न करावेत, असे प्रतिपादन राज्य सेवा हमी आयुक्त (नाशिक विभाग) चित्रा कुलकर्णी यांनी केले. गेल्या दोन दिवसांपासून आयुक्त चित्रा कुलकर्णी आपल्या टीमसह जिल्ह्याच्या दौऱ्यावर आहेत. त्यांनी अक्राणी आणि तळोदा यांसारख्या दुर्गम भागांना भेट देऊन प्रत्यक्ष परिस्थितीचा आढावा घेतला. या दौऱ्यात त्यांना असे आढळून आले की, नेटवर्कची आणि




मनुष्यबळाची कमतरता असतानाही या कायद्याची अंमलबजावणी अत्यंत प्रामाणिकपणे केली जात आहे. केवळ भाषिक संवादाची अडचण वगळता, कामकाज समाधानकारक असल्याचे त्यांनी नमूद केले.

दिनांक १७ सप्टेंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या बैठकीत त्यांनी जिल्हास्तरीय यंत्रणांचा आढावा घेतला. यावेळी जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी, अप्पर जिल्हाधिकारी धनंजय गोगटे, निवासी उपजिल्हाधिकारी कल्पना ठुबे यांच्यासह इतर अधिकारी उपस्थित होते. या बैठकीत बोलताना कुलकर्णी यांनी जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा यंत्रणा करत असलेल्या परिश्रमांचे कौतुक केले. त्यांच्या नेतृत्वाखालीच जिल्ह्याने हे यश मिळवले असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी आयुक्त कुलकर्णी यांनी उपस्थित अधिकाऱ्यांना काही महत्त्वाच्या सूचना दिल्या. त्या म्हणाल्या, सेवा हमी कायद्यांतर्गत ९०% कामे वेळेत पूर्ण होणे अपेक्षित आहे. त्यामुळे सर्व अर्ज वेळेत निकाली काढा. अर्जामध्ये काही त्रुटी आढळल्यास अर्ज परत करताना नेमकी कोणती कागदपत्रे कमी आहेत, याचा सविस्तर तपशील नमूद करा, जेणेकरून अर्जदाराला मदत होईल. तसेच, शक्य असल्यास पहिल्याच टप्प्यात अर्जदाराला सर्व त्रुटी कळवाव्यात आणि अपील अर्ज तात्काळ संबंधित अधिकाऱ्याकडे पाठवावेत, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

# 'सेवा पंधरवडा': शासनाच्या योजना घराघरापर्यंत पोहोचवणार

**नंदुरबार । दिपक गोसावी**

शासनाच्या विविध सेवा आणि कल्याणकारी योजना थेट नागरिकांपर्यंत पोहोचवण्यासाठी नंदुरबार जिल्ह्यामध्ये दिनांक १७ सप्टेंबर २०२५ पासून 'सेवा पंधरवडा' सुरू झाला आहे. येत्या २ ऑक्टोबरपर्यंत चालणाऱ्या या उपक्रमाचे उद्घाटन करताना राज्याच्या सेवा हमी आयुक्त चित्रा कुलकर्णी यांनी उपक्रमाला शुभेच्छा दिल्या.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित या कार्यक्रमावेळी बोलताना जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी यांनी 'सेवा पंधरवडा' हा प्रशासन आणि नागरिक यांच्यातील दुवा अधिक मजबूत करण्यासाठी असल्याचे सांगितले. त्या म्हणाल्या, या पंधरवड्याचा मुख्य उद्देश लोकाभिमुख योजनांचा लाभ प्रत्येक नागरिकाला मिळावा, सेवा अधिक




सुलभ व्हाव्यात आणि तक्रारींचे जलद निवारण व्हावे हा आहे.

यावेळी उपस्थित लाभार्थ्यांना रेशन कार्ड, ७/१२, वनपट्टे, उत्पन्न आणि वारस नोंद यांसारख्या विविध दाखल्यांचे वितरण करण्यात आले.

जिल्हाधिकारी डॉ. सेठी यांनी यावेळी काही नाविन्यपूर्ण उपक्रमांची माहिती दिली. दुर्गम भागातील ५० गावांमध्ये घरपोच दाखले दिले जातील., मजुरांच्या रोजगाराशी संबंधित अडचणी आणि त्यांच्या कुटुंबाच्या समस्या सोडवण्यासाठी एक विशेष हेल्पलाइन सुरू केली जाणार आहे., अर्जदाराला त्याच्या अर्जाची सद्यस्थिती कुठे आहे, हे ट्रॅक करता यावे यासाठी एक विशेष टूल विकसित केले जाईल.

सुमारे १२० महाविद्यालयांमध्ये ई-सुविधा केंद्र सुरू करण्यात येणार आहेत.

या पंधरवड्यामध्ये विविध विभाग नागरिकाभिमुख कार्यक्रमांचे आयोजन करतील. महसूल विभाग दाखले वाटप, जमिनीच्या नोंदीतील दुरुस्ती आणि प्रलंबित अर्जांचा निपटारा करेल. आरोग्य विभाग दुर्गम भागात शिबिरे आयोजित करेल, तर कृषी विभाग नैसर्गिक शेतीला प्रोत्साहन देईल. महिला व बालविकास विभाग कुपोषण निर्मूलनावर काम करेल आणि सामाजिक न्याय विभाग दिव्यांगांसाठी शिबिरे घेईल. यासोबतच, ग्रामविकास आणि शिक्षण विभागांचेही विविध उपक्रम राबवले जातील. असे त्या म्हणाल्या.

# सरस्वती विद्यालय राजेगावच्या शिवानी कचरेची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड

**माजलगाव । दर्शन डोंगरे**

माजलगाव तालुक्यातील राजेगाव येथील सरस्वती विद्यालय राजेगाव ची विद्यार्थिनी कुमारी शिवानी गणेश कचरे हिची राष्ट्रीय आट्यापाट्या स्पर्धेसाठी राज्याच्या संघामध्ये निवड झाली आहे तिला शाळेचे शिक्षक व राष्ट्रीय पंच म्हणून निवड झालेले श्री नितीन पुटवाड सर यांचे मार्गदर्शन लाभले तिचे सर्वत्र कौतुक होत आहे

याविषयी सविस्तर वृत्त असे की राज्य पातळीवरील आट्यापाट्या स्पर्धेमध्ये बीड जिल्ह्याचे प्रतिनिधित्व सरस्वती विद्यालय राजेगाव या संघाने केले या संघाचे प्रशिक्षक नितीन पुटवाड सर यांनी परिश्रमपूर्वक संघाची तयारी करून घेतली राज्य पातळीवर या संघाने उल्लेखनीय कामगिरी करत प्रदर्शन केले व संघातील खेळाडू शिवानी गणेश कचरे ची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली.

शिवानी कचरे ही महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करणार आहे ग्रामीण भागातील सोयी सुविधांपासून दूर असलेल्या एका छोट्या गावातील खेळाडू राष्ट्रीय पातळीपर्यंत पोहोचली याचे कौतुक सर्वत्र होत आहे. तिचे व प्रशिक्षक नितीन पुटवाड यांचे वसंतदादा पाटील प्रतिष्ठान माजलगाव चे अध्यक्ष श्रीमान राधाकृष्ण अण्णा होके पाटील, सचिव श्री अशोकराव होके पाटील, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष बाळासाहेब कचरे, उपाध्यक्ष विजय साळवे, डॉक्टर जनक चौरे गावातील सर्व शिक्षणप्रेमी नागरिक, शाळेचे मुख्याध्यापक कचरे सर, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले व राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.



# अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचे सरसकट पंचनामे करा-डॉ.राधाकृष्ण विखे पाटील

**दैनिक राज आनंद । अहिल्यानगर । प्रतिनिधी**

अतिवृष्टीमुळे पाथर्डी व शेवगाव तालुक्यातील शेतपीके, फळपीके, बंधारे, रस्ते, घरे, ओढे पुलांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. एक लाख हेक्टर क्षेत्राचे नुकसान झाल्याची प्राथमिक माहिती आहे. आपत्तीच्या काळात शासन जनतेच्या पाठीशी खंबीरपणे उभे असून नुकसानीच्या मदतीपासून एकही नागरिक वंचित राहणार नाही. अतिवृष्टीमुळे झालेल्या या नुकसानीचे सरसकट पंचनामे करण्यात यावेत, असे निर्देश राज्याचे जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली.

अतिवृष्टीमुळे पाथर्डी व शेवगाव तालुक्यात झालेल्या नुकसानीची श्री.विखे पाटील यांनी आज प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली. यावेळी उपस्थित शेतकरी व नागरिकांसमवेत संवाद साधून त्यांनी त्यांना धीर दिला. नुकसानीची माहिती घेतली. याप्रसंगी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, उप विभागीय अधिकारी प्रसाद मते, तहसीलदार उद्धव नाईक, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे, जलसंपदा विभागाचे कार्यकारी अभियंता जगदीश पाटील, सायली पाटील, जिल्हा जलसंधारण अधिकारी पांडूरंग गायसमुद्रे तसेच अक्षय कर्डीले यांच्यासह संबंधित यंत्रणांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी पाथर्डी तालुक्यातील करंजी येथे पुलाची तसेच ग्रामस्थांच्या घराची, किराणा दुकानाची पाहणी करत झालेल्या नुकसानीची ग्रामस्थांकडून माहिती घेतली. मौजे देवराई, मौजे तिसगाव येथील अतिवृष्टीमुळे शेतपीक, घरांच्या झालेल्या नुकसानीची त्यांनी पाहणी केली. शेवगाव तालुक्यातील मौजे अमरापूरकर व परिसरातील नुकसानीची पाहणी करत ग्रामस्थांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी शेवगाव येथे नागरिकांच्या समस्या, तक्रारींचे लेखी निवेदन स्वीकारली.



पालकमंत्री डॉ. विखे पाटील म्हणाले, केवळ आपल्या जिल्ह्यातच नव्हे तर संपूर्ण देशभरात मोठ्या प्रमाणात पाऊस होत आहे. मागील अनेक वर्षात झाला नाही एवढा पाऊस या भागामध्ये झाला आहे. पावसामुळे नाले, ओढे वाहून जाण्याबरोबरच अनेक ठिकाणी तलावांची हानी झाली आहे. नागरिकांच्या घरांची, दुकानांचे तसेच शेतपिकांची मोठी हानी झाली आहे. या पावसामुळे साधारणपणे १ लाख हेक्टर क्षेत्राचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. अशा संकटाच्या काळात नागरिकांना आधार देण्याची गरज आहे. नुकसानग्रस्त गावातील सरसकट पंचनामे करण्याच्या सूचना प्रशासनाला देण्यात आल्या आहेत.

पंचनाम्याची प्रक्रिया तातडीने होण्यासाठी जिल्ह्याच्या इतर तालुक्यातील मनुष्यबळ याकामी उपयोगात आणावे, असेही त्यांनी सांगितले.

पावसाच्या पाण्यामुळे ज्या नागरिकांच्या घराचे नुकसान झाले असेल अशा कुटुंबांच्या निवाऱ्याची तात्पुरती व्यवस्था करण्यात यावी. त्याठिकाणी अन्न, पाणी, वीज पुरेशा प्रमाणात औषधी उपलब्ध करून देण्यात यावी. ज्या नागरिकांची घरे संपूर्ण उध्वस्त झाली असतील अशा नागरिकांना प्रधानमंत्री आवास योजनेतून घर उभारणीसाठी मदत करण्याचा सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या नुकसानीबाबत प्राथमिक अंदाज सुमारे १ लाख हेक्टर क्षेत्र बाधित झाले आहे. एनडीआरएफ व एसडीआरएफच्या निकषांनुसार मदत देण्यात येईल तसेच अधिकाधिक मदत व पुनर्वसनासाठी शासनस्तरावर प्रयत्न केले जातील, असे पालकमंत्री डॉ. विखे पाटील यांनी सांगितले.

# रक्तदान चळवळीत उल्लेखनीय कार्याबद्दल महेश कुवर यांचा आरोग्य मंत्र्यांनी केला गौरव

## ५५०० पेक्षा जास्त रक्त बॅगांचे केले संकलन

**मोलगी । रविंद्र वळवी**

अक्कलकुवा ग्रामिण रुग्णालयातील एकात्मिक चाचणी व समुपदेशन केंद्राचे समुपदेशक महेश कुवर हे नंदुरबार जिल्ह्यात राबवित असलेल्या रक्तदान चळवळीची दखल घेऊन त्यांचा आरोग्य मंत्री ना. प्रकाश आबिटकर यांच्या हस्ते जिल्हाधिकारी कार्यालयात गौरव करण्यात आला. महेश कुवर हे गेल्या १५ वर्षा पासुन अक्कलकुवा ग्रामिण रुग्णालयात एकात्मिक चाचणी व समुपदेशन केंद्राचे समुपदेशक म्हणून काम पाहत आहेत. महेश कुवर हे एच. आय. व्ही. एड्स या गंभीर आजाराबाबत समाजात, विद्यार्थ्यांत, तसेच समलिंगी संबंध ठेवणारे पुरुष, यांच्यात मोठ्या प्रमाणावर जनजागृती करुन एच. आय. व्ही. एड्स या आजारावर नियंत्रण मिळविण्यासाठी प्रयत्नशील आहेत. हे नियमित काम करत असतांना नंदुरबार जिल्ह्यात सिकलसेल अनेमिया, थॅलेसिमिया, आदी रुग्णांना मोठ्या प्रमाणावर रक्ताची गरज भासते तसेच गरोदर मातां, लहान बालके, अत्यावश्यक स्थितील रुग्ण, नियमित शस्त्रक्रिया आदी



प्रकारच्या रुग्णांना तातडीने रक्ताची गरज असते. जिल्ह्यात रुग्णांच्या नातेवाईकांचे रक्तदान करण्याचे प्रमाण अत्यल्प असल्यामुळे अत्यवस्थ स्थितीतील रुग्णांचे रक्तासाठी मोठया प्रमाणात हाल होत असतात ही बाब हेरुन महेश कुवर यांनी आपली जबाबदारी सांभाळत जिल्ह्यात रक्तादानाची चळवळ सुरु केली यात जिल्हा भरात विविध सामाजिक संघटना, युवा मंडळे, संस्था यांना प्रोत्साहीत करत रक्तदान शिबिरांचे यशस्वी आयोजन केले. त्यांनी १४ वर्षाच्या कालावधीत नंदुरबार जिल्ह्यात तसेच लगतच्या गुजरात व मध्य प्रदेश या राज्यात सुमारे १२५ पेक्षा जास्त रक्तदान शिबिरांचे आयोजन करुन सुमारे ५५०० पेक्षा जास्त रक्त बॅगांचे संकल करुन रक्तदान चळवळीच्या माध्यमातून हजारो रुग्णांचे प्राण वाचविले आहेत. त्यांनी अक्कलकुवा तालुक्यात एका दिवसात चार रक्तदान शिबिरे तर एका महिन्यात तब्बल ११ शिबीरे घेऊन शेकडो रक्त बॅगांचे संकलन केले आहे. त्यांनी आतापर्यंत जिल्ह्यात व इतर ठिकाणी अनेक रक्त दान शिबीरे आयोजित केली आहेत त्यांनी शहादा येथे रक्त दान शिबीर आयोजित करुन एका दिवसात ३०० रक्त बॅगांचे संकलन करुन जिल्ह्यात विक्रम केला आहे तर कोरोनाच्या काळात सर्वत्र रक्ताचा तुटवडा जाणवत असतांना त्यांनी त्या काळात सुमारे १००० पेक्षा जास्त रक्त बॅगांचे संकलनाचे काम केले आहे. या रक्तदान चळवळीतील उल्लेखनीय कार्याबद्दल महेश कुवर यांचा आरोग्य मंत्री ना. प्रकाश आबिटकर यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात सन्मान चिन्ह, प्रमाणपत्र देऊन गौरव केला. यावेळी आमदार आमश्या पाडवी, आमदार राजेश पाडवी, जिल्हाधिकारी डॉ. मिताली सेठी, पोलीस अधिक्षक श्रवण दत्त, आरोग्य उप संचालक डॉ. कपिल आहेर, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. विनय सोनवणे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. रविंद्र सोनवणे, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. नरेश पाडवी आदी उपस्थित होते. महेश कुवर यांना सन्माना बद्दल वैद्यकीय अधिक्षक डॉ. जर्मनसिंग पाडवी, अक्कलकुवा ब्लड डोनेट गृपचे सुधीरकुमार ब्राम्हणे, रविंद्र गुरव, दिनेश खरात, जि. प. शिक्षक दिपक सोनवणे यांनी अभिनंदन केले आहे.

# सणसर येथील पुराच्या पाण्याचा कायमस्वरूपी बंदोबस्त करण्यात यावा कृषीमंत्री भरणे मामाकडे नागरिकांची मागणी



**इंदापूर । प्रतिनिधी**

एप्रिल महिन्यात चारी विभाग माळेगाव यांना माहिती अधिकार संघटनेचे तालुका अध्यक्ष विकास क्षत्रिय यांनी सणसर ओढा खोलीकरण करून मिळावे म्हणून निवेदन देण्यात आले असून आज दोन वेळा पूर येऊन सुद्धा चारी विभाग यांनी गांभीर्याने त्या निवेदनाची दखल घेतली नसल्यामुळे कामचुकार कर्मचारी व अधिकारी यांच्यावर कारवाई करण्यात यावी म्हणून लवकर जिल्हाअधिकारी पुणे यांच्याकडे तक्रार देऊन कारवाई करण्याची मागणी करण्यात येणार आहे.इंदापूर तालुक्यात १४ सप्टेंबर रोजी रात्रीपासून सकाळपर्यंत सुमारे १२ तास झालेल्या मुसळधार पावसामुळे सणसर येथील ओढ्याला पूर आला. यामुळे शेतकऱ्यांच्या शेतीचे आणि ओढ्यालगतच्या घरांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. या परिस्थितीची पाहणी करण्यासाठी कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी सणसर येथे भेट

स्थानिक पातळीवर मदतकार्य पूरग्रस्त कुटुंबांना तातडीची मदत म्हणून ग्रामपंचायत सणसर येथील सरपंच यशवंत पाटील ग्रामसेवक सचिन पवार प्रविण शिंदे तसेच भवानीनगर येथील हॉटेल अलंकारचे मालक सोनू नेवसे दिपक नेवसे दिपक निंबाळकर यांनी ओढ्यालगतच्या नागरिकांना सांवर-भात बूंदी वाटप करून मानवतेचे दर्शन घडवले. ग्रामस्थांनी सणसर ओढ्याच्या वारंवारच्या पुरामुळे होणाऱ्या नुकसानीवर कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. त्यांनी सुचवले की, ओढ्याच्या उगमापासून ते सणसर येथे नदीला मिळण्यापर्यंत सर्वेक्षण करून अरुंद भाग रुंद करावेत आणि अतिक्रमणे हटवावीत. तसेच, ओढ्यालगतच्या घरांचे इतरत्र स्थलांतर करावे, जेणेकरून भविष्यात अशा आपत्ती टाळता येतील आणि नागरिकांना सुरक्षित जीवन जगता येईल.दिली. त्यांनी कृषी आणि महसूल विभागाला नुकसानग्रस्त शेतकरी व नागरिकांचे तातडीने पंचनामे करून शासनामार्फत नुकसान भरपाई देण्याचे निर्देश दिले. कृषीमंत्री भरणे यांनी सांगितले की, सध्या पाऊस सुरू असून काहीवेळा अचानक तीव्र पाऊस पडत आहे. यामुळे ओढे-नाल्यांना पूर येत आहे. हवामान खात्याच्या अंदाजा नुसार १९ सप्टेंबरपर्यंत पाऊस कायम राहण्याची शक्यताआहे, त्यामुळे नागरिकांनी सतर्क राहावे. इंदापूर तालुक्यातील सणसर आणि परिसरात सुमारे १५६ मिलिमीटर (सहा इंच) पावसाने पूरस्थिती निर्माण झाली असून लवकर याची व्यवस्था करण्यात यावी म्हणून सरपंच यशवंत पाटील शब्बीर काझी सुमित पाटील पार्थ निवाळकर विक्रमसिंह निंबाळकर प्रविण शिंदे किरण गायकवाड अक्षय निवाळकर यांनी मागणी केली आहे.

# राज्यात इलेक्ट्रिक दुचाकी टॅक्सी सेवा आज पासून सुरू

## भाडेदर निश्चित परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची माहिती

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्य सरकारने महाराष्ट्र बाईक - टॅक्सी नियम, २०२५ अंतर्गत राज्यात सेवा देणाऱ्या इलेक्ट्रिक दुचाकी वाहनांचे भाडेदर जाहीर केले आहेत. मोटार वाहन अधिनियम, १९८८ च्या कलम ७३ व ९६ नुसार शासनाला मिळालेल्या अधिकारांचा वापर करून हा निर्णय घेण्यात आला असून, तो तात्काळ लागू होणार आहे. आता दुचाकी टॅक्शी राज्यात उद्यापासून सुरू करण्यात येत असल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली.

या संबधी घेण्यात आलेल्या बैठकीतील निर्णयानुसार इलेक्ट्रिक दुचाकी टॅक्सींसाठी प्रति किलोमीटर १०.२७ प्रमाणे प्रवासी भाडे आकारले जाईल. याशिवाय पहिला टप्पा १.५ किमीचा असुन प्राथमिक भाडे १५/- इतके अनिवार्य असेल. म्हणजेच प्रवास कितीही छोटा असो, किमान १५ आकारले जाणार असून, त्यानंतर प्रत्येक किलोमीटरला



१०.२७ प्रमाणे दर लागू होईल. असे दर लागू करण्यात आले आहेत.

राज्य परिवहन प्राधिकरणाने तीन प्रमुख कंपन्यांना (मे. उबेर इंडिया सिस्टीम्स प्रा. लि., मे. रॅपिडो ट्रान्सपोर्टेशन सर्व्हिसेस प्रा. लि., व मे. ॲनी टेक्नॉलॉजीज प्रा. लि.) तात्पुरता मुंबई महानगर क्षेत्रासाठी प्राव्हिजनल लायसन्स मंजूर केला आहे.

या परवान्याची मुदत ३० दिवसांची असून, त्यानंतर अंतिम लायसन्ससाठी अर्ज करावा लागेल. तात्पुरत्या परवान्यातील सर्व अटी-शर्ती मान्य करूनच कंपन्यांना पुढील परवाना देण्यात येईल.या निर्णयामुळे प्रवाशांना स्वस्त, सोयीस्कर व पर्यावरणपूरक प्रवासाची सुविधा उपलब्ध होणार आहे. इलेक्ट्रिक दुचाकी टॅक्सींच्या माध्यमातून वाहतुकीवरील ताण कमी होऊन, प्रदूषणाला आळा बसण्यास मदत होईल, असा विश्वास राज्य परिवहन मंत्री श्री प्रताप सरनाईक यांनी व्यक्त केला आहे. सध्या उबेर, रॅपिडो व ॲनी टेक्नॉलॉजीज या कंपन्यांना परवाना देण्यात आला आहे. मुंबई महानगर क्षेत्रात प्रायोगिकरित्या सेवा सुरू होणार आहे,अशी माहिती परिवहन मंत्री सरनाईक यांनी दिली.

# वेळप्रसंगी छातीवर गोळ्या झेलू पण शक्तिपीठ महामार्ग होऊ देणार नाही:माजी राज्यमंत्री बच्चू कडू

**हिंगोली (वृत्तसंस्था)**-शक्तिपीठ महामार्गांची मागणीच कोणी केली नाही त्यानंतरही सरकार महामार्ग बांधण्याच्या तयारीत आहे. मात्र वेळप्रसंगी छातीवर गोळ्या झेलू पण हा महामार्ग होऊ देणार नाही असा इशारा माजी राज्यमंत्री बच्चू कडू यांनी शनिवारी ता. १३ सरकारला दिला आहे.



शेतकरी शेतमजूर हक्क परिषदेच्या निमित्ताने वाई गोरक्षनाथ (ता. वसमत) येथे राज्यमंत्री बच्चू कडू आले होते. यावेळी त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी बोलतांना कडू म्हणाले की, राज्यात पेरणी पासून ते काढणी पर्यंतची सर्व कामे हमी योजनेमध्ये झाली पाहिजेत. तसेच कर्जमुक्ती, दिव्यांगांच्या प्रश्नांवर आमची लढाई सुरु आहे. या मागणीसाठी शेतकरी, शेतमजूर हक्क परिषद घेतली जात आहे. पुढे परभणी, नांदेड, सोलापूर येथे कार्यक्रम होणार असून जळगाव येथे मोर्चा काढला जाणार आहे. या आंदोलनानंतरही शासनाने या प्रश्नांकडे लक्ष दिले नाही तर ता. २८ रोजी बुटी बोरी (नागपूर) येथे सर्व एकत्र येऊन नागपूरला वेढा देणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. त्यापुर्वी शासनाने आमच्या मागण्यांवर निर्णय घेणे अपेक्षीत असल्याचे त्यांनी सांगितले.राज्यातील पवनार ते पत्रा देवी या सुमारे ८०२ किलोमीटरच्या शक्तिपीठ महामार्गांची कोणीही मागणी केली नाही. शेतकऱ्यांचीही मागणी नसतांना हा महामार्ग मंजूर करून शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित केल्या जात आहेत. मात्र या महामार्गाला आमचा विरोध आहे. सरकारने या महामार्गाचे काम सुरु करू नये अन सुरु केलेच तर काम बंद करून वेळप्रसंगी गोळ्या झेलण्याची आमची तयारी असल्याचा इशारा कडू यांनी यावेळी दिला.राज्यातील शेतकऱ्यांना काहीही कमी पडणार नाही असे सरकार सांगत आहे. मात्र नुकसानीचे पंचनामेच केले जात नाही त्यामुळे मदत कशी मिळणार. सरकारचे हे डुप्लिकेट बोलणे असल्याचा आरोप त्यांनी केला. सरकारने पावसामुळे नुकसानी साठी मदत जाहिर करावी, कर्जमुक्ती जाहिर करावी अशी मागणी त्यांनी यावेळी केली. सरकार एकीकडे हमी भाव जाहिर करीत आहे अन दुसरीकडे ३४०० रुपयांनी सोयाबीन विक्री करावे लागत असेल तर हमी भावाचा अर्थ काय असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

# एक महिन्यात शेतकऱ्यांना कर्जमाफी द्या

नाशिक (वृत्तसंस्था)-राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने आज सकाळी नाशिकमध्ये शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर आक्रोश मोर्चा काढला. या मोर्चात बोलताना खासदार सुप्रिया सुळे यांनी सरसकट कर्जमाफीची मागणी करत सरकारला गंभीर इशारा दिला. हा मोर्चा एका मोठ्या संघर्षाची सुरुवात असल्याचे सुप्रिया सुळे यांनी म्हटले. तसेच शेतकऱ्यांना एका महिन्यात सरसकट कर्जमाफी दिली नाही, तर मंत्र्यांना राज्यात फिरू देणार नाही, असे सुप्रिया सुळे म्हणाल्या.सुप्रिया सुळे म्हणाल्या, आज आपण सरसकट कर्जमाफीसाठी एकत्र आलो आहोत. हा मोठ्या संघर्षाचा प्रारंभ आहे. प्रत्येक जिल्ह्यात जाऊन कलेक्टरना भेटा आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना कळवा की त्यांनी दिलेला शब्द पाळावा. ओला दुष्काळ जाहीर करा आणि सरसकट कर्जमाफी द्या, असे त्यांनी शेतकऱ्यांना आवाहन केले. जर एका महिन्याच्या आत शेतकऱ्याला न्याय मिळाला नाही, तर या सरकारला आम्ही महाराष्ट्रभर कुठेही फिरू देणार नाही. मंत्र्यांना गावोगाव रोखले जाईल, असा इशारा सुप्रिया सुळे यांनी सरकारला दिला.

सुप्रिया सुळे यांनी लाडकी बहीण योजनेवरूनही सरकारवर टीका केली. महिलांसाठी लाडकी बहीण योजना आणली. त्यासाठी निधी मंजूर केला, पण पहिल्याच टप्प्यात पंचवीस लाख महिलांची नावे कमी केली. हे आम्ही कदापि सहन करणार नाही. गावा-गावात, वस्त्यावस्त्यांवर जाऊन आंदोलन करू आणि महिलांना त्यांचे पैसे मिळवून देऊ, असे त्यांनी ठामपणे सांगितले.

तुम्ही म्हटला होता सरसकट कर्जमाफी करु. आम्हीही एकदा असा शब्द दिला होता. तेव्हा युपीएचे सरकार होते. मनमोहन सिंह हे पंतप्रधान होते. आदरणीय पवार साहेब कृषीमंत्री होते. तेव्हा एक -दोन नाही तर तब्बल सत्तर हजार करोड रुपयांची कर्जमाफी केली होती. शेतकऱ्याचा सातबारा कोरा केला होता, असे सुप्रिया सुळे म्हणाल्या.नाशिक जिल्हा बँकेने ६५ हजार शेतकऱ्यांची नावे कमी करुन, त्या जागेवर नवीन कुठली तरी नावे घेतली. आमच्यावर अन्याय केल्याची माहिती मला एका शेतकऱ्याने दिली. आम्ही सगळे आठ खासदार दिल्लीला जाऊ. आम्ही केंद्र सरकारकडे न्याय मागू आणि नाशिक जिल्हा बँकेची चौकशी लावण्याची जबाबदारी आजपासून आमची असा शब्द सुप्रिया सुळेंनी शेतकऱ्यांना दिला. शेतकऱ्यासाठी कितीही आंदोलने करु पण न्याय मिळवून देऊ अशी ग्वाही त्यांनी दिली.



# खा.सोनवणे म्हणाले, रेल्वेची स्वप्नपुर्ती होतेय आता पाणी द्या, अन् फडणवीसांकडून दुष्काळमुक्तीचा शब्द

## रेल्वे मार्ग उद्घाटन अन् रेल्वे शुभारंभ प्रसंगी खा.सोनवणेंचे धडाकेबाज भाषण

**बीड | प्रतिनिधी**

बीडला रेल्वे यावी, यासाठी बीड जिल्हा रेल्वे कृती समिती आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांनी काम केले. अनेक वर्ष रेल्वेसाठी संघर्ष सुरू राहिला. दरम्यान, बीड रेल्वेचे स्वप्न आज पुर्ण होत आहे. आज अहिल्यानगर ते बीड रेल्वे सुरू झाली असून बीड ते परळीपर्यंत कामही गतीने सुरू आहे. रेल्वेची स्वप्नपुर्ती होतेय, मुख्यमंत्रीसाहेब आता बीडला २५ टिएमसी पाणी द्या, अशी मागणी खा.बजरंग सोनवणे यांनी केले. यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या भाषणात मराठवाडा दुष्काळमुक्त करण्याचे प्रयत्न सुरू आहेत, बीडलाही पाणी आणू, असा शब्द यावेळी दिला.

बीड येथील रेल्वे स्थानक येथे अंमळनेर ते बीड नवीन रेल्वे मार्गाचे उद्घाटन आणि बीड ते अहिल्यानगर रेल्वेचा शुभारंभ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी व्यासपिठावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, मंत्री पंकजा मुंडे, खा.रजनीताई पाटील, आ.धनंजय मुंडे, आ.विजयसिंह पंडित, आ.नमीता मुंदडा, आ.काळे, माजी.आ.भिमराव धोंडे यांची उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलताना खा.बजरंग सोनवणे म्हणाले, बीड जिल्ह्यातील नागरिकांना रेल्वे येत असल्याचा आज आनंद होत आहे. अंमळनेर ते बीड नवीन रेल्वे मार्गाचे उद्घाटन आणि बीड ते अहिल्यानगर रेल्वेचा शुभारंभ होत असून बीड रेल्वेसाठी कृती समितीने मोठे काम केले. यात नामदेवराव क्षीरसागर, हनुमंत उपरे, अमोल गलधर आदिंसह विविध क्षेत्रात काम करणाऱ्या जनतेने लढा उभा केला. त्याच मागणीचे आज आपण फलीत पाहत आहोत. मागील पन्नास वर्षांपासून आपण रेल्वेची मागणी करत होतो. आज रेल्वेची मागणी आणि स्वप्नही पुर्ण होत आहे. अहिल्यानगर ते परळी अशी रेल्वेची लांबी ही २६१ किलोमिटर आहे. त्यापैकी मार्च २०२४ पर्यंत ९९ किलोमिटर पुर्ण झाली आणि आपल्या कार्यकाळात आजपर्यंत ६७ लांबी पुर्ण झाली. ज्या दिवशी खासदार झालो, त्यानंतर पहिली बैठक रेल्वेची घेतली. तुमच्या सर्वांच्या आर्शीवादाने खासदार झाल्यानंतर मी सालगडी म्हणून काम करण्याचा प्रमाणिक प्रयत्न करत आहे. रेल्वे ट्रॅक टाकून घेण्यापासून प्रत्येक ठिकाणी येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी प्रयत्न करत आहे. आतापर्यंत १६ बैठका आपण घेतल्या. रेल्वे अधिकाऱ्यांपासून रेल्वेमंत्र्यांपर्यंत भेटत आहे. याच कारणाने आपल्या रेल्वेच्या कामाला गती मिळालेली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार हे आपल्याला निधी देत आहेत. बीडकरांची बार्शीनाक्यावरील थांब्याची मागणी आहे, त्यासाठी आपला प्रस्ताव गेलेला आहे. रेल्वेमुळे विद्यार्थी, गोरगरिब आणि शेतकऱ्यांच्या मालाची ने-आण करण्यासाठी उपयोग होणार आहे. आता डिझेलवर रेल्वे सुरू होत आहे. परंतु हायस्पिड रेल्वे ही लाईटवर धावणार आहे. त्यासाठी आष्टी आणि सिरसाळा येथे दोन सबस्टेशन होत आहेत. ते काम लकवरच पुर्ण होईल. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री हे तिजोरीचे मालक आहेत, ते या कामासाठी हात मोकळे सोडतीलच, असा विश्वास आहे. दरम्यान, मराठवाड्याचा पाण्याचा अनुशेष भरून काढा. आम्हाला उजनीतून २५ टिमएसी पाणी मांजरा धरणात द्या आणि तिथून ते मांजरसुंब्याला आणि, जेणेकरून आमच्या बीड जिल्ह्यात कायमस्वरूपी दुष्काळमुक्त होईल, असे खा.सोनवणे म्हणाले.



### खा.सोनवणेंना रेल्वेप्रवासाचा मान

बीडला रेल्वे आलीच पाहिजे, अशी मागणी वर्षानूवर्षे सुरू होती. अखेर ही मागणी आता पुर्ण झाली असून दि.१७ सप्टेंबर रोजी बीड ते अहिल्यानगर अशी पहिली रेल्वे सुरू करण्यात आली. या पहिल्या प्रवाशी रेल्वेत खा.बजरंग सोनवणे यांनी प्रवास केला. त्यांच्यासोबत बीडमधील रेल्वेलढ्यात सहभागी झालेले नागरिक देखील सहभागी झाले होते.

### खा.सोनवणेंच्या पोस्टरने वेधले लक्ष

बीड येथील रेल्वे स्थानक येथील अंमळनेर ते बीड नवीन रेल्वे मार्गाचे उद्घाटन आणि बीड ते अहिल्यानगर रेल्वेचा शुभारंभ कार्यक्रमात खा.बजरंग सोनवणे यांचे 'कार्यक्षम खासदार' असे लिहलेले पोस्टर तरूणांनी आणले होते. अगदी सर्व कार्यक्रमात या पोस्टरने लक्ष वेधून घेतले होते. कार्यक्रमांसह रेल्वे प्रवासातही तरूण असे पोस्टर घेवून फिरताना दिसले. कार्यक्रमांदरम्यान, पोस्टर हातात घेत खा.बजरंग सोनवणे तुम आगे बढोच्या घोषणांनी यावेळी तरूणांनी दिल्या.

## खैरगांव येथे विश्वकर्मा जयंती उत्साहात साजरी

**नायगांव | हानुमंत चंदनकर**

नांदेडच्या नायगांव तालुक्यातील खैरगांव येथील इंदुमती पेट्रोल पंपासमोर पांचाळ यांच्या दुकानात आज दिनांक १७ सप्टेंबर रोजी विश्वकर्मा जयंती उत्साहात साजरी करण्यात आली कृषी उत्पन्न बाजार समितीचे श्रीनिवास पाटील चव्हाण यांच्या शुभहस्ते विश्वकर्मा प्रतिमेचे पुजा आरती करण्यात आली यावेळी वसंत जाधव, तुळशीराम पाटील मोरे , पंडित पाटील सुगावे, रमेश कांडाळकर, बालाजी देशमुख लोहगावकर सुरज पाटील जाधव, संतोष पांचाळ, शिवराज पांचाळ,रावसाहेब पाटील,पुरोहीत,गंगाधर आप्पा स्वामी खैरगावकर , रावसाहेब पाटील, गणेश शिपाळे, अशोक जाधव, सुभाष जाधव, संतोष चापोली,शुभम पांचाळ, , बजरंग, प्रकाश डोईफोडे,माधव शिपाळे, श्रध्दा पांचाळ, आराध्या पांचाळ, नागेश पांचाळ, गजानन जाधव, उमाकांत पदमवार यांच्या नायगांव शहरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ओबीसींच्या आरक्षणाला धक्का न लावता मराठा समाजाला आरक्षण हवे-आव्हाड

**नाशिक (वृत्तसंस्था)**-ओबीसींच्या आरक्षणाला धक्का न लावता मराठा आरक्षण मिळावे, ही आमच्या नेत्यांची भूमिका आहे. हैदराबाद गॅझेट लागू झाल्यानंतर सहा महिन्यांनी लोकांना कळेल की काय मिळालं? मराठा ओबीसी वाद पेटवण्याचा प्रयत्न करण्यात आला. ओबीसींच्या आरक्षणाला धक्का लागू नये , ही भूमिका आम्ही व्यासपीठावरून जाहीर करतो, असे शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी म्हटले आहे.

आमदार जितेंद्र आव्हाड म्हणाले की,ओबीसी विरुद्ध मराठा हा अतिशय संवेदनशील मुद्दा आहे. दोन्ही समाजांना अस्वस्थ करण्यात यश आले आहे. काल छगन भुजबळ साहेबांबाबत बोलले गेले की, त्यांच्या पोटात, गळ्यात लाथ मारा आणि मंत्रिमंडळातून हाकलून द्या. अशा ज्येष्ठ नेत्याचा आणि मंत्र्याचा अपमान राज्याच्या राजकीय संस्कृतीला शोभणारा नाही.जितेंद्र आव्हाड म्हणाले की, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ महाराष्ट्रात स्थापन झाला आहे, तर गांधीची हत्या करणाराही महाराष्ट्रातच जन्माला आला आहे. हैदराबाद गॅझेटवर अनुसूचित जमातीचे (डढ) अधिकारी नाहीत. हे गॅझेट लागू झाल्यानंतर सहा महिन्यांनी लोकांना कळेल की, त्यांना काय मिळाले आहे. भुजबळ ओबीसी समाजाचे नेते आहेत. सरकारमधील नेतेच जर बोलत नसतील, तर ओबीसी समाजाची काय अवस्था असेल?.आज जमीनदार मराठा अल्पभूधारक झाला आहे. आरक्षण कोणा एकासाठी येत नाही. मराठा समाजासाठी आम्ही सोबत राहू.

## भव्य पालखी सोहळा पदयात्रा हनुमान मंदिर हेडगेवार चौक नायगांव ते श्री भगवान बालाजी मंदिर नरसी

**नायगांव | हनुमंत चंदनकर**

नांदेडच्या नायगांव तालुक्यातील नरसी येथील श्री भगवान बालाजी मंदिर येथे वार्षिक नवरात्र उत्सवानिमित्त प्रथमच हनुमान मंदिर हेडगेवार चौक नायगांव ते श्री भगवान बालाजी मंदिर नरसी दिनांक २२/०९/२०२५ ते ०२/१०/२०२५ नित्य भव्य पालखी पदयात्रेचे आयोजन करण्यात आले आहे बालाजी मंदिर समितीचे अध्यक्ष श्री हनुमंतराव पाटील चव्हाण, सचिव राजेश पाटील भिलवंडे, उपाध्यक्ष श्री श्रावण पाटील भिलवंडे, यांच्या मार्गदर्शनाखाली पालखी सोहळा पदयात्रेचे आयोजन करण्यात आले आहे नवरात्र उत्सवानिमित्त नायगांव तालुक्यासह परिसरातील हजारो भाविक यात्रेमध्ये सहभागी होणार आहेत दैनंदिन पूजाविधी अभिषेक आरती कार्यक्रम संपन्न होणार आहेत पदयात्रेत सहभागी होण्यासाठी युवा नेते नगरसेवक पंकज पाटील चव्हाण, डॉ गंगाधर पोलावार, साईनाथ मेडेवार, मनोज आरगुलवार, साईनाथ वट्टमवार, पवन गादेवार व गावकरी मंडळ नायगांव तरी परिसरातील भाविकांनी लाभ घ्यावा असे आवाहन युवा नेते नगरसेवक पंकज पाटील चव्हाण यांनी केले आहे.

## परळी शहरातील मुख्य रस्त्यावर तिरुपती मंदिर धरतीवर पदचारी फुटपाथ करा-मा.नगराध्यक्ष दिपक देशमुख

**परळी वैजनाथ | प्रतिनिधी**

परळी शहराचे माजी नगराध्यक्ष दिपक देशमुख यांनी परळी नगर परिषदेच्या मुख्याधिकारी यांना निवेदन दिले असून या निवेदनात शहरातील मुख्य रस्त्यावर तिरुपती मंदिर धरतीवर पदचारी फुटपाथ करा अशी मागणी केली आहे.परळी शहरातील रेल्वे स्टेशन व बस स्थानक रोड पासून हाडबे रोड, नेहरु चौक (तळ) ते वैद्यनाथ मंदिर पर्यंत येणाऱ्या भाविकांची गैरसोय होऊ नये म्हणून पदचारी अच्छादन (फुटपाथ शेड) तिरुपती मंदिर धरतीवर करणे बाबत निवेदन देण्यात आले निवेदनात पुढे नमूद केले आहे.कि, परळी शहर तीर्थ विकास या मध्ये समाविष्ट असल्याने त्या बजेट मध्ये रेल्वे स्टेशन व बस स्थानक मार्गे हाडबे रोड, नेहरु चौक (तळ) ते वैद्यनाथ मंदिर पर्यंत पायी येणाऱ्या भाविकांसाठी पदचारी (फुटपाथ) वर उन्ह. पाऊसा पासून स्वरक्षण मिळण्यासाठी तिरुपती मंदिर धरतीवर भाविकांसाठी पदचारी मार्गे आच्छादित करुन रोड वरील भाविकांचा त्रास कमी होईल व रोड वरील वाहनांना सुद्या भाविकांचा त्रास होणार नाही. तरी वैद्यनाथ मंदिरला येणाऱ्या भाविकांची गैरसोय होणार नाही. तरी या वर त्वरित कार्यवाही करावी अशी मागणी केली आहे.



## शासकीय तंत्रनिकेतन,बीड येथे मराठवाडा मुक्ती संग्राम दिन व प्रबोधनकार ठाकरे जयंती उत्साहात साजरी

**बीड | प्रतिनिधी**

शासकीय तंत्रनिकेतन, बीड येथे आज मराठवाडा मुक्ती संग्राम दिन व प्रबोधनकार ठाकरे जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. सकाळी साडे सात वाजता प्राचार्य डॉ. ए. के. वाघमारे यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. यानंतर उपस्थितांनी सामूहिकरित्या महाराष्ट्र गीताचे गायन करून राज्याच्या वैभवाचा गौरव व्यक्त केला.या निमित्ताने विद्यार्थ्यांमध्ये मराठवाडा मुक्ती संग्रामातील शौर्यगाथा तसेच प्रबोधनकार ठाकरे यांच्या वैचारिक कार्याची माहितीदेण्यात आली.प्रबोधनकार ठाकरे हेसमाजसुधारक, पत्रकार आणि लेखक म्हणून महाराष्ट्राच्या वैचारिक परंपरेतील थोर व्यक्तिमत्त्व मानले जातात.त्यांनी 'प्रबोधन' नियतकालिकातून समाजजागृती केली. अस्पृश्यता निवारण, हुंडाबंदी,अंधश्रद्धा निर्मूलन यांसाठी त्यांनी कार्य केले. 'भिक्षुकशाहीचे बंड' सारख्या ग्रंथातून त्यांनी समाजातील अनिष्ट प्रथा व कर्मकांडावर कठोर प्रहार केला.



या कार्यक्रमास विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.तसेच विभागप्रमुख बनसोडे यू.व्ही. यंत्र अभियांत्रिकी,गिते बी. एम.विद्युतअभियांत्रिकी,वीर एस.बी. संगणक अभियांत्रिकी,गावडे पी. बी.अनुविद्युत,सोहेल सय्यद स्थापत्य व अभिजीत जाधव मुद्रण तंत्रज्ञान यांच्यासह इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्र संचालन जिमखाना उपाध्यक्षवाघ डी.जी. आणि सहाय्यकपवार विवेक यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी संस्थेचे प्रसिद्धी प्रमुखथीगळे व्ही.जी आणि देशमुख व्ही.एस यांचे विशेष सहकार्य लाभले.या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांना प्रेरणादायी संदेश मिळाल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

## राहुलकुमार अवचट यांना माहिती अधिकार महासंघाचा उत्कृष्ट माहिती अधिकार पुरस्कार प्रदान

**सोलापूर | प्रतिनिधी**

दौंड तालुक्यातील यवत येथील सामाजिक कार्यकर्ते व माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे राज्य कार्यकारणी सदस्य राहुलकुमार दत्तात्रय अवचट यांना माहिती अधिकार कार्यकर्ता फेडरेशन यांच्यावतीने दरवर्षी देण्यात येणारा उत्कृष्ट माहिती अधिकार पुरस्कार २०२५ देऊन सन्मानित करण्यात आले असून माहिती अधिकार कार्यकर्ता फेडरेशनच्या राज्यव्यापी माहिती अधिकार कार्यकर्ता अधिवेशन नुकतेक निर्भय महाराष्ट्र पार्टीचे संस्थापक अध्यक्ष जितेंद्र भावे यांच्या प्रमुख उपस्थितीत सोलापूर येथे संपन्न झाले.

या कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख मार्गदर्शक जितेंद्र भावे, महासंघाचे संस्थापक अध्यक्ष सुभाष बसवेकर, पश्चिम महाराष्ट्राचे संजय किणीकर, महाराष्ट्राचे प्रसिद्धीप्रमुख राहुल कदम आदी मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन महापुरुषांच्या प्रतिमांना पुष्पहार करून करण्यात आली. यावेळी पश्चिम महाराष्ट्र



अध्यक्ष संजय किणीकर यांनी प्रास्ताविक केले. यावेळी निर्भय महाराष्ट्र पार्टीचे अध्यक्ष जितेंद्र भावे यांनी महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यातून आलेल्या माहिती अधिकार कार्यकर्त्यांना अमूल्य मार्गदर्शन केले , माहिती अधिकार कार्यकर्ता हा भ्रष्टाचार बाहेर काढण्यासाठी कागदावर लढत असतो तर निर्भय महाराष्ट्र पार्टी रस्त्यावर लढत असते हे दोघे एक झाल्यास प्रशासनात मोठा बदल घडून आणू शकतात

दोघांनी एकत्र येऊन प्रशासनाच्या विरोधात काम करावे अशी अपेक्षा व्यक्त केली. यावेळी माहिती अधिकार कार्यकर्ता फेडरेशनचे संस्थापक अध्यक्ष सुभाष बसवेकर यांनी आलेल्या सर्व कार्यकर्त्यांना बहुमूल्य असे मार्गदर्शन केले व माहिती अधिकार बरोबरच इतर कायद्यांचा देखील अभ्यास करावा असे आवाहन केले. यावेळी महाराष्ट्रातील काही निवडक कार्यकर्त्यांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले यावेळी २०१७ पासून माहिती अधिकार क्षेत्रात कार्य करणारे दौंड तालुक्यातील यवत येथील सामाजिक कार्यकर्ते व राज्य कार्यकारणी सदस्य राहुलकुमार दत्तात्रय अवचट यांना उत्कृष्ट माहिती अधिकार पुरस्कार २०२५ निर्भय महाराष्ट्र पार्टीचे जितेंद्र भावे व महासंघाची संस्थापक अध्यक्ष सुभाष बसवेकर यांच्या हस्ते पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.

## ओबीसी आरक्षण वाचविण्यासाठी केज मध्ये १९ सप्टेंबर रोजी मोर्चाचे आयोजन

**केज | प्रतिनिधी**

ओबीसी आरक्षण वाचवण्यासाठी केज शहरामध्ये भव्य मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे.ओबीसी नेते प्रा.लक्ष्मण हाके, नवनाथ वाघमारे, बळीराम खटके यांच्या प्रमुख उपस्थितीत शुक्रवार दि.१९ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजता जय भवानी चौक (धारूर चौक) केज या ठिकाणी मोर्चाला सुरुवात होणार आहे.केज येथे लक्ष्मण हक्के यांच्या नेतृत्वा खाली ओबीसीआरक्षण बचाव मोर्चा काढण्यात येणार आहे.पोलिसांनी या मोर्चाला परवानगी दिलेली आहे.मोठ्या संख्येने ओबीसी समाजातील नागरिक या मोर्चात सहभागी होतील असा सर्वांना विश्वास आहे.हा मोर्चा मराठा आरक्षणासाठी जारी करण्यातआलेल्या शासन निर्णयाच्या विरोधात आहे. आंदोलकांचा आरोप आहे की हा निर्णय ओबीसी आरक्षणाला धोका निर्माण करतो. हा जीआर ओबीसीचे आरक्षण संपुष्टात आणणारा आहे.ही लढाई ओबीसीच अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी आहे. ओबीसी समाजात एकूण ३७४ जातींचा समावेश आहे.त्यात महाराष्ट्रात ३५% असलेला मराठा समाजाचा समावेश केला तर लाभ कोणालाही होणार नाही.विद्यार्थ्यामध्ये केवळ स्पर्धा आणि स्पर्धाच होईल.मुळातच आरक्षण हे मागासलेला समाजाला पुढे आणण्यासाठी देण्यात आलेले आहे.शैक्षणिक, व सामाजिक विकास व्हावा यासाठी आरक्षण लागू करण्यात आलेले आहे.महाराष्ट्र सरकारने मराठा समाजातील जे गरीब लोक आहेत त्यांच्या साठी १०% जागा राखीव दिलेल्या आहे.यामुळे ओबीसी समाजाला जे सोयी- सवलती मिळतात त्या सर्व मराठा समाजाला देखील मिळतात.त्या नंतरही ओबीसी प्रवर्गा तच समावेश करावा ही मागणी योग्य वाटत नाही.प्रत्येक गावात सर्वात जास्त मराठा समाज असतो.त्यामुळे तेथील सरपंच,किंवा आमदार इत्यादी हे मराठा समाजाचेच निवडून येतात.सत्तेत सर्वांना प्रतिनिधित्व मिळावे म्हणून काही मतदारसंघ हे ओबीसी, एस सी,एस टी इत्यादी साठी राखीव ठेवलेली आहे.याठिकाणी ओबीसींना प्रतिनिधित्व मिळणारच नाही.एकूण ३५% मराठा समाजा तील २० % मराठा हे कुणबी असून त्यांना ओबीसी प्रवर्गात समाविष्ट केलेलेच आहे. तमाम महाराष्ट्रातून या मोर्चात लोक सहभागी होणार आहेत.ओबीसी चे न्याय,हक्क, आरक्षण, संरक्षण, व आपल्या लेकरांच्या भविष्यासाठी आपल्या भागातील लहान थोर प्रतिष्ठित नागरिक महिला भगिनी यांनी मोठ्या संख्येने हजारोंच्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन सकल ओबीसी समाज केज तालुका यांच्या वतीने करण्यात आले आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077